सत्यमेव जयते

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१६-२०१७)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

रायगड जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल

दुसरा अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस सभागृहाला दिनांक ... एप्रिल, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
एप्रिल, २०१६

अनुसुचित जमाती कल्याण समिती

(२०१६-२०१७)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

रायगड जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल

दुसरा अहवाल

एचबी ३१२०-१

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१६-२०१७)

समिती प्रमुख

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

सदस्य

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.

(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(८) प्रा. चंद्रकात सोनवणे, वि.स.स.

(९) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१२) रिक्त

(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(३) श्री. संजय काबंळे, अवर सचिव (समिती),

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन **समितीचा दुसरा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे.

समितीने दिनांक १९ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत रायगड येथे बैठक घेण्यात आली. उक्त बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण, व अनुशेष, शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना व प्रकल्प कार्यालयातंर्गत शासकीय/अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन चर्चा करण्यात आली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आ वासित मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी रायगड जिल्हा बैठकीसंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार करून त्यासंदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई
दिनांक : ... एप्रिल २०१६

रुपेश म्हात्रे,
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

अनुसूचित जमाती कल्याण समिती

अहवाल

जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग (जि. रायगड)

(१) जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचा-यांची जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेली प्रकरणे—

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक १९ ते २१ ऑगस्ट २०१५ या कालावधीत रायगड येथे बैठक घेण्यात आली. दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गात कार्यरत असलेल्या ९ कर्मचा-यांच्या जात पडताळणीची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे केव्हापासून व कोणत्या समितीकडे प्रलंबित आहेत अशी समितीने पृच्छा केली असता, जिल्हाधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, लिपिक-टंकलेखक या संवर्गातील ३ कर्मचा-यांची प्रकरणे प्रलंबित आहेत. श्री. मोतीराम गंगाधर धरमोड, यांचे प्रकरण औरंगाबाद समितीकडे दिनांक २६ जुलै २०१३ पासून प्रलंबित आहे. श्री. विकास मनोहर बोंडले यांचे प्रकरण औरंगाबाद समितीकडे दिनांक १९ मे २०१५ पासून प्रलंबित आहे. श्री. रविंद्र नरसिंगराव तोंडरोड यांचे प्रकरण औरंगाबाद समितीकडे दिनांक २ जून २०१४ पासून प्रलंबित आहे. तलाठी संवर्गातील एकूण ४ प्रकरणे आहेत. श्री. सी.एल.पवार, तलाठी हे सन २०१० पासून सतत गैरहजर आहेत. त्यांना जात पडताळणीचा प्रस्ताव सादर करण्यासाठी दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १९ जानेवारी २०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि, त्यांनी अद्यापपर्यंत जात पडताळणीचा प्रस्ताव सादर केलेला नाही. श्री. पवार हे सतत गैरहजर असल्यामुळे त्यांना दिनांक २६ जून २०१५ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार निलंबित करण्यात आले आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी तहसिलदार महाड यांच्याकडून प्रपत्र १ ते ४ मध्ये अहवाल मागविण्यात आला आहे. त्यांचा अहवाल प्राप्त होताच श्री. पवार, तलाठी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात येईल. श्री. ए.सी.चोगले, तलाठी, तहसील कार्यालय, पेण यांचे प्रकरण कोकण विभाग समितीकडे दिनांक २० सप्टेंबर, २००७ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेले आहे. श्री. मारुती परशुराम मळेकर, तहसिल कार्यालय, रोहा, यांचे प्रकरण, कोकण विभाग, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे. तसेच, अनुसूचित जमातीच्या दाव्याची तपासणी करण्याकरिता दिनांक १२ डिसेंबर २०११ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. श्री. एस.सी.ठाकर, तलाठी, तहसिल कार्यालय, अलिबाग, यांचे प्रकरण दिनांक १९ डिसेंबर २००६ रोजी, कोकण विभाग, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे. वाहनचालक या संवर्गातील श्री. ए. व्ही. ठाकुर, कर्जत यांचे प्रकरण दिनांक २२ डिसेंबर २००६ रोजी ठाणे समितीकडे पाठविण्यात आले आहे, तर श्री. ए. जी. मेंढे, वाहनचालक, माणगाव यांचे प्रकरण दिनांक २२ डिसेंबर २००६

रोजी अमरावती समितीकडे सादर करण्यात आले आहे. समितीने जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणी पाठपुरावा करून साक्षीच्यावेळी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी असे निदेश दिले.

विभागाने दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १० फेबुवारी २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने श्री. रविंद्र तोडरोड व श्री. मोतीराम धरमोड या दोन्ही कर्मचा-यांच्या नियुक्ती दिनांकापूर्वी त्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे पाठविण्याची कारणे कोणती, श्री. तोडरोड यांचा नियुक्तीचा दिनांक २५ ऑगस्ट २०१४ आहे आणि जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविल्याचा दिनांक २ जून २०१४ आहे. श्री. धरमोड यांच्या नियुक्तीची दिनांक २७ ऑगस्ट २०१४ रोजी आहे आणि जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविण्याचा दिनांक २६ जुलै २०११ आहे अशी समितीने विचारणा केली असता, अप्पर जिल्हाधिकारी यांनी सदर कर्मचारी पूर्वी महाविद्यालयात शिकत होते आणि त्यावेळी त्यांनी महाविद्यालयातर्फे जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत. असे समितीस विदित केले.

समितीने या कर्मचा-यांची नियुक्ती माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये झाली आहे. नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जर वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करावी लागते, कार्यालयाने स्मरणपत्र पाठविण्याची आवश्यकता नाही. संबंधित कर्मचा-याची ही जबाबदारी आहे. त्या कर्मचा-यांकडून पाठपुरावा करून घेण्याचे काम कार्यालयाचे आहे. त्यादृष्टीने कार्यालयाने कोणती कारवाई केली आहे अशी विचारणा केली असता, अप्पर जिल्हाधिकारी यांनी ६ महिन्यांच्या आत त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. जात पडताळणी समितीकडून उत्तर नकारात्मक आले तर त्यानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच कायद्यातील तरतुदी तपासून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असे समितीस विदित केले.

समितीला या ठिकाणी जी माहिती देण्यात येत आहे ती चुकीची आहे दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, नवीन नियुक्ती देताना ज्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यात आली आहे त्या प्रवर्गातील जात पडताळणी झाली आहे किंवा नाही, हे तपासून त्यानंतरच नियुक्तीचे आदेश द्यावयाचे आहेत. तसेच पुढील ६ महिन्यांच्या मुदतीत जात प्रमाणपत्र सादर केले नसेल तर त्याच क्षणी जो कोणी असेल त्याला बडतर्फ करणे गरजेचे आहे. याप्रकरणी अशी कार्यवाही झाली नाही जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित कर्मचा-याची जबाबदारी आहे, त्यांनी ६ महिन्यानंतर प्रमाणपत्र सादर केले नसेल तर त्याची सेवा खंडीत करणे आवश्यक आहे. या ठिकाणी शासनाच्या धोरणातील व कायद्यातील बाबींचे उल्लंघन झालेले आहे. ही कार्यवाही वेळीच झालेली नसल्यामुळे संबंधीत कर्मचा-यांवर उक्त शासन निर्णयान्वये कारवाई करावी व अशा कर्मचा-यानां सेवेत ठेवण्यास जबाबदार असलेल्या अधिका-यांविरुद्ध कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा. असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेले श्री रविंद्र तोडरोड व श्री मोतीराम धरमोड यांची नियुक्ती माहे ऑगस्ट २०१४ मध्ये झालेली आहे परंतु जात पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव अनुक्रमे दिनांक २ जून २०१४ व २६ जुलै २०११ रोजी पाठविण्यात आले आहे. सदर कर्मचारी नोकरीपूर्वी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना महाविद्यालयातर्फे त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आले आहे. दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नविन कर्मचा-यांची नियुक्ती देताना, नियुक्ती दिल्याच्या दिनांकापासून पुढील ६ महिन्याच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्यात यावे. श्री. रविंद्र तोडरोड यांचा जात पडताळणीचा प्रस्ताव दिनांक २ जून २०१४ रोजी पडताळणी समितीकडे पाठविलेला आहे. समितीच्या साक्षीच्या वेळी म्हणजेच दिनांक १० फेबुवारी, २०१६ रोजी पर्यंत पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठवून जवळपास १ वर्ष ८ महिन्याचा कालावधी पूर्ण झालेला आहे. परंतू कार्यालयाने त्यांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही. व श्री. मोतीराम धरमोड यांचा जात पडताळणीचा प्रस्ताव दिनांक २६ जुलै २०११ रोजी पडताळणी समितीकडे पाठविलेला आहे. श्री. धरमोड यांची ऑगस्ट २०१४ रोजी सेवेत नियुक्ती होण्याच्या ३ वर्षे अगोदरच त्यांनी जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे म्हणजेच दोन्ही कर्मचा-यांविरुद्ध उक्त शासन निर्णयान्वये कारवाई होणे समिताला अभिप्रेत आहे परंतू अद्यापपर्यंत त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली नाही. या दोन्ही कर्मचा-यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर न करता त्यांना सेवेत ठेवण्यास जबाबदार असणा-या संबंधित अधिका-यांविरुद्ध जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. व दोन्ही कर्मचा-यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच श्री. विकास मनोहर बोंडले यांची नियुक्ती दिनांक २७ ऑगस्ट २०१४ रोजी झालेली आहे व त्यांचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे दिनांक १९ मे २०१५ रोजी पाठविण्यात आला आहे. पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविण्याचा अवधी ६ महिन्यापेक्षा जास्त झालेला आहे, तथापि त्यांनी अद्यापपर्यंत कार्यालयास जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सबब श्री. बोंडले यांना सेवेतून बडतर्फ करण्यात यावे अशी शिफारस समिती करीत आहे. सदर प्रकरणी सुचविलेल्या कार्यवाही नुसार श्री. बोंडले यांच्याविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा.

(२) वन हक्क कायद्यान्वये दळी प्लॉटच्या वाटपाची प्रलंबित असलेली प्रकरणे—

वन हक्क कायद्यानुसार रायगड जिल्ह्यातील ६३१६ दावे मान्य केले आहेत. तसेच ७७ सामुदायिक दावे मान्य केले आहेत. येथे दळी प्लॉटचा विषय अनेक वर्षापासून प्रलंबित आहे.५३९८ दळी धारकांचे ४७७ दळी प्लॉट आहेत. यात जवळ-जवळ १०९५३ हेक्टर इतकी जमीन गुंतलेली आहे. दळी प्लॉटची प्रक्रीयापूर्ण झाल्यानंतर त्यासंबंधीचा अहवाल समितीला साक्षीच्या बैठकीच्यावेळी सादर करावा असे समितीने निदेश दिले.

दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या साक्षीच्यावेळी विभागाने खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात समितीला माहिती सादर केली :–

दळी प्लॉट विषयी करावयाच्या कार्यवाही संदर्भातील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विशेष मोहिमेंतर्गत दळी प्लॉटचे खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले आहे :—

अ. क्र.	तालुका	एकूण दळी लॉट	त्यापैकी वनहक्क कायद्यांतर्गत मंजुर प्लॉट	वनहक्क कायद्यांतर्गत वाटप क्षेत्र	त्यापैकी यापुर्वीनिर्वणी करण झालेले प्लॉट	निर्वणीकरण क्षेत्र (हे.आ.)	त्यापैकी निर्णय घेण्यावर शिल्लक प्लॉट
१	अलिबाग	२७	२२	६५९.७४.७०	३	४२.६७.३०	२
२	पेण	६४	६४	२०८४.१०.६८	०	०	०
३	पनवेल	४९	३४	११७३.९९.३५	५	१६५.१४.००	१०
४	उरण	४	२	४९.०८.८०	२	१५१.५३.००	०
५	कर्जत	५६	५४	१०५३.६१.९७	०	०	२
६	खालापूर	७४	५७	११००.९१.३९	८	७९.४४.९४	९
७	माणगांव	४२	४२	११०५.१०.५२	०	०	०
८	तळा	८	८	१५७.०७.८६	०	०	०
९	रोहा	१२७	१२२	१७४९.८६.६१	३	१२२.५२.००	२
१०	सुधागड	९	९	२७३.८७.४३	०	०	०
११	महाड	१७	५	१४६.९३.४०	११	३३७.७५.००	१
	एकूण	४७७	४१९	९५५४.३२.७१	३२	८९९.०६.२४	२६

वरील प्रमाणे निर्णय घेतल्यानंतर शिल्लक असलेल्या २६ प्लॉटमध्ये खालीलप्रमाणे कारणे आल्याने प्रकरणे प्रलंबित आहेत :—

(१) १० प्लॉट मध्ये गावपातळीवर तपास केला असता, त्यांचे वारस आढळून येत नाहीत.

(२) २ प्लॉट धरण क्षेत्राखाली बुडीत आहेत.

(३) ४ प्लॉट उप वनसंरक्षक यांच्या यादीत नसल्याने प्रलंबित आहे.

(४) १ प्लॉट मध्ये दळी नायकाने दळी प्लॉट नको आहे, असा जबाब दिला आहे,

(५) १ प्लॉट हा दोन तालुक्यात दाखवलेला असून, खालापूर तालुक्यात मंजूर केला आहे.

(६) ५ प्लॉट मध्ये दळीधारकांमध्ये मतभेद असून, ते वादातील असल्याने प्रलंबित आहेत.

(७) २ प्लॉट मध्ये वन अधिनियमांचे कलम ३५ (३) लागू आहे.

(८) १ प्लॉट मध्ये आदिवासी वाडी अस्तित्वात नाही.

तसेच अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत रायगड जिल्ह्यात ६३१६ वैयक्तिक व ७२ सामुहिक वनहक्क दावे मान्य केले आहेत.

वरील प्रमाणे सादर केलेल्या माहितीनुसार साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीने दळी प्लॉट वाटप प्रकरणी विभागाने खुलासा करावा अशी विचारणा केली, प्रधान सचिव (महसूल विभाग) यांनी दळी प्लॉटच्या वाटपाबाबतची २६ प्रकरणे शिल्लक असून ती वगळता १०० टक्के वाटप झालेले आहेत. २६ प्रकरणातील १० प्रकरणामध्ये वारस आढळून येत नाहीत, दोन प्लॉटचे क्षेत्र हे धरणाच्या क्षेत्रात गेले आहे, ४ प्लॉट फॉरेस्टच्या यादीमध्ये नसल्यामुळे प्रलंबित आहेत, १ प्लॉट संबंधिताने 'नको' असे लेखी दिले आहे. सदरहू प्रकरणी १ महिन्याच्या आत अंतिम आदेश काढण्यात येतील असे समितीला विदित केले.

समितीने १० प्लॉटचे वारस आढळून येत नाहीत, त्यांचा शोध घेण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत तसेच प्लॉट क्रमांक ५ हा दोन तालुक्यामध्ये दाखविण्यात आला असून तो खालापूर तालुक्यामध्ये मंजूर करण्यात आला आहे, एक प्लॉट दोन वेळा कोणत्या आधारावर दाखविण्यात आला आहे अशी विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी वारसदाराच्या स्थानिक पातळीवर, संबंधितांच्या नातेवाईकाकडे व प्रसिद्धी देऊन शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे परंतु वारस आढळून येत नसल्याने सदरहू प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात येत आहे. तसेच असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्लॉट क्रमांक ५ हा दोन तालुक्यामध्ये दाखविण्यात आला असून प्लॉट क्रमांक ५ मधील वाद हा दोन तालुक्यात दाखविण्यात आला असल्याने त्यांची शहानिशा करावी लागणार आहे. अन्यथा सदर प्रकरणी स्थानिक लोक न्यायालयात जाऊ शकतात. वाद सोडविण्यासाठी पंचनामा करून जबाब घेण्यात आले आहेत वहिवाटीबाबतचा वाद असल्यामुळे महसूल विभागाच्या पातळीवर जबाब घेतले असून गाव पातळीवर ग्राम सभा घेण्यात आली होती. असे समितीला सांगण्यात आले.

अभिप्राय व शिफारशी :

वन हक्क कायद्यानुसार रायगड जिल्ह्यातील दळी प्लॉटचा विषय अनेक वर्षापासून प्रलंबित आहे एकूण ५३९८ दळी धारकांचे ४७७ दळी प्लॉट आहेत. त्यापैकी ४१९ दळी प्लॉटची प्रक्रिया पूर्ण झाली आहे शिल्लक असलेल्या २६ प्लॉटच्या प्रकरणामध्ये २ प्लॉट धरण क्षेत्राखाली बुडीत, ४ प्लॉट उप वनसंरक्षक यांच्याकडे प्रलंबित, १ प्लॉट हा दोन तालुक्यात दाखवलेला आहे, ५ प्लॉट मध्ये दळीधारकांचे मतभेद असून, ते वादातील आहे. इत्यादी कारणांनी प्रकरणे प्रलंबित असून या प्रकरणापैकी १० प्रकरणामध्ये वारस आढळून येत नाही. वारसदारांसाठी स्थानिक पातळीवर, संबंधिताच्या नातेवाईकाकडे पुन्हा एकदा विचारणा करावी व प्रसिद्धी देऊन शोध घेण्याचा प्रयत्न करावा त्यानंतर प्लॉटचे वारस आढळून येत नसल्यास याप्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात यावा अशी समितीची सूचना आहे.

तसेच प्लॉट क्रमांक ५ हा दोन तालुक्यात दाखविण्यात आला आहे. याप्रकरणात वहिवाटीचा वाद असल्यामुळे या प्लॉटची पुन्हा चौकशी करून तपासणी करावी व योग्य तो निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद, अलिबाग (जि. रायगड)

(३) जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागातंर्गत अनुसूचित जमातीची रिक्त असलेली पदे

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक १९ ते २१ ऑगस्ट २०१५ या कालावधीत अलिबाग जि. रायगड येथे बैठक घेण्यात आली. समितीने दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी जिल्हा परिषद, अलिबाग या कार्यालयातील वर्ग ३ व ४ मधील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात जिल्हा परिषद यंत्रणांकडून राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत जिल्हा परिषद कार्यालयाने दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने बैठकीत आढावा घेतला.

जिल्हा परिषद कार्यालयांतर्गत येत असलेल्या महिला व बाल कल्याण विभागांत अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरावयाचे अंगणवाडी पर्यवेक्षिकांची ३ पदे रिक्त आहेत पदे रिक्त असण्याची कारणे काय अशी समितीने पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सरळसेवेने भरावयाची अंगणवाडी पर्यवेक्षिकांची ३ पदे ४ वर्षांपासून रिक्त आहेत. या पदासाठी १० वर्षांची सेवा पूर्ण झाली पाहिजे व १० वी पास असणे आवश्यक आहे. सध्या ज्येष्ठता यादीमध्ये अनुसूचित जमातीतील उमेदवार उपलब्ध नाहीत त्यामुळे पदे रिक्त आहेत असे समितीस विदित केले.

समितीने या पदासाठी प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांच्या नावांची यादी मागविण्यात आली होती काय, अशी पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून यादी मागविण्याची आवश्यकता नाही, याचे कारण म्हणजे सदरहू पद अंगणवाडीवर काम करणा-या कर्मचा-यामधून सरळ सेवेन भरले जाते. त्यांच्या ज्येष्ठता यादीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील १० वी पास व त्यांची १० वर्षांची सेवा पूर्ण झालेले कर्मचारी उपलब्ध नाहीत असे समितीला विदित केले.

समितीने अनुसूचित जमातीचे उमेदवार उपलब्ध होत नाही. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये आदिवासी महिला अंगणवाडी कर्मचा-यांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गातील १२५ अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. या कर्मचा-यांना सेवेत किती वर्षे झालेले आहेत अशी विचारणा केली असता उप मुख्य

कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी या पदाकरिता इयत्ता १० वी पास असलेले व १० वर्षांची सेवा पूर्ण होत असलेले ०८ उमेदवार सन २०१६ मध्ये उपलब्ध होणार आहे. तसेच ज्या उमेदवारांची सेवा जास्त झालेली आहे असे उमेदवार इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी पास आहेत. १० वी पास नसल्यामुळे त्या परीक्षेला बसू शकत नाहीत. असे समितीला विदित केले.

समितीने सेवेत असलेल्या उमेदवारांना १० वर्षापेक्षा किंवा २० वर्षापेक्षाही जास्त कालावधी झालेला असेल आणि त्यांनी इयत्ता ७ वी पर्यंतच शिक्षण झालेले असेल तर अशा उमेदवाराना या पदावर घेण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय किंवा इयत्ता १० वी पास नसलेल्यांना या पदावर नियुक्ती करणेबाबत शासनाकडे परवानगी मागितली होती काय अशी पृच्छा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अंगणवाडी पर्यवेक्षिका हे पद वर्ग-३ चे असल्यामुळे या पदासाठी उमेदवार पदवीधर असणे आवश्यक आहे. परंतु अंगणवाडी सेविकेतून पद भरावयाचे असल्यास सदरहू पदाकरिता उमेदवाराची १० वर्षाची सेवा झाली पाहिजे व तो इयत्ता १० वी पास असणे आवश्यक आहे. परंतु सदरहू पदाकरिता विशिष्ट प्रवर्गासाठी किंवा अनुसूचित जमातीच्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व सेवेचा कालावधी शिथील करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल, असे समितीला सांगितले. अंगणवाडी पर्यवेक्षिकांची पदे चार वर्षांपासून रिक्त असल्यामुळे सदरहू पदाकरिता पात्रता धारण करणारा अनुसूचित जमातीचा उमेदवार मिळाला नाही. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय झाला आहे. याप्रकरणी शासनाकडे प्रस्ताव पाठवून प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे समितीने निदेश दिले.

दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीने जिल्हा बैठक होऊन ५ महिन्यांचा कालावधी झालेला असताना अद्यापपर्यंत शैक्षणिक पात्रता शिथील करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला नाही. शासनाकडे सदर प्रकरणी प्रस्ताव पाठविण्यास विलंब लागण्याची कारणे काय, अशी पृच्छा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शासनाकडे दिनांक १९ जानेवारी २०१६ रोजी शैक्षणिक पात्रता शिथील करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यामध्ये १० वर्ष सेवा व १० वी पास पात्रतेचे उमेदवार मिळत नसल्याने सदरहू अट शिथील करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. असे समितीला विदित केले.

अभिप्राय व शिफारशी :

महिला व बाल कल्याण विभागात अनुसुचित जमाती प्रवर्गातून अंगणवाडी पर्यवेक्षिकांची ३ पदे मागील चार वर्षांपासून रिक्त आहेत. रिक्त पदांकरिता अंगणवाडी सेविकेची पात्रता १० वर्षांची सेवा पूर्ण होणे व १० वी पास असणे आवश्यक आहे. परंतु अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून शैक्षणिक पात्रता व

सेवेचा कालावधी पूर्ण करणा-या महिला अंगणवाडी सेविका उपलब्ध होत नाही. सबब, समितीने दिलेल्या निदेशानुसार आदिवासी महिला प्रवर्गाकडून अंगणवाडी पर्यवेक्षिकांची पदे भरताना १० वर्षे सेवा व १० वी पास पात्रतेची अट शिथिल करणेबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर तीन महिन्यांच्या आत योग्य तो निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सन २०१६ मध्ये या पदाकरिता १० वी पास व १० वर्षांची सेवा पूर्ण होत असलेले ८ महिला कर्मचारी उपलब्ध होणार आहे. उक्त महिला उमेदवार प्राप्त होताच या उमेदवारांना अंगणवाडी पर्यवेक्षिका पदावर तात्काळ नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी ही समिती शिफारस करीत आहे.

समितीने पंचायत विभागांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातून ग्रामविकास अधिका-यांची दोन पदे व माजी सैनिक प्रवर्गातून भरावयाचे ग्रामसेवकांचे एक पद केव्हापासून रिक्त आहे. अशी पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील रिक्त पदे भरण्याकरिता एकाच वेळी जाहीरात प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया राबविण्यात येते. जाहिरातीमध्ये मागासप्रवर्गासाठी रिक्त असलेल्या पदांचा उल्लेख करण्यात येतो. सदरहू पदाकरिता उमेदवार ऑनलाईन फॉर्म भरुन त्यांची लेखी परीक्षा घेण्यात येते व त्यानंतर लेखी परीक्षेच्या मेरीटनुसार उमेदवार पात्र ठरविण्यात येतात. पुढील महिन्यात होणा-या परीक्षेमध्ये रिक्त पदे भरण्यात येणार आहेत असे समितीला विदित केले.

अभिप्राय व शिफारशी :

पंचायत विभागांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातून ग्रामविकास अधिका-यांची दोन पदे रिक्त आहेत, रिक्त असलेली पदे जिल्हा परिषद कार्यालयाने दिलेल्या जाहिराती नुसार माहे मार्च-एप्रिल, २०१६ मध्ये होणा-या परीक्षा मधून तात्काळ भरण्यात यावी व पदे भरण्यात आल्याबाबतचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील माजी सैनिक प्रवर्गातून ग्रामसेवकाचे एक पद भरण्यासाठी प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास यांचे कार्यालयाकडून उमेदवारांची नावे मागविणे आवश्यक होते तसेच इतर ठिकाणच्या एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प कार्यालयामध्ये उमेदवारांनी नोंदणी केली आहे त्यांच्याकडून उमेदवाराची नांवे प्राप्त झाली असती परंतु त्यानुसार कार्यवाही झालेली दिसत नाही. यापुढे अशा प्रकारे रिक्त जागांच्या संदर्भात, प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास या कार्यालयाकडून उमेदवारांची नावे मागवून रिक्त पदे भरण्यात यावी असे समितीने निदेश दिले

अभिप्राय व शिफारशी :

अनुसूचित जमाती प्रवर्गातील माजी सैनिक प्रवर्गातून ग्राम सेवकांचे एक पद रिक्त आहे. समितीने दिलेल्या निदेशान्वये, राज्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात नोंदणी असलेल्या माजी सैनिकांच्या उमेदवाराची नावे शैक्षणिक पात्रतेनुसार प्राप्त करून घेण्यात यावी व रिक्त असलेले ग्रामसेवकाचे एक पद तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

शिक्षण विभागांतर्गत उप शिक्षकांच्या अतिरिक्त पदासंदर्भात उप शिक्षकांची पदे जादा भरण्यात आलेली आहेत. पदवीधर शिक्षकांची पदे कमी आहेत त्यामुळे जादा झालेल्या शिक्षकांचे पदवीधर शिक्षकांमध्ये नियुक्ती देऊन समायोजन करण्यात येणार आहे. सदर प्रकरणी काही मुख्याध्यापकांना पदावनत करावे लागणार आहे. त्यामुळे जादा शिक्षक राहणार नाहीत. संच मान्यता प्राप्त झाल्यानंतर काही लोकांना पदावनत करण्यात येईल व काही लोकांना पदोन्नती देण्यात येणार आहे. असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले असता, समितीने उप शिक्षकांची जादा पदे भरण्यात आलेली आहेत. शिक्षकांच्या संच मान्यतेनंतर अतिरिक्त पदांचे समायोजन करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

शिक्षण विभागात उप शिक्षकांची पदे जादा भरण्यात आली आहे. पदवीधर शिक्षकांची पदे कमी भरण्यात आल्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचे पदवीधर शिक्षकांमध्ये समायोजन करण्यात आले आहे अतिरिक्त झालेल्या मुख्याध्यापकांना पदावनत करणे व उप संचालक यांचेकडे सादर केलेल्या संवर्गनिहाय संच मान्यतेला तात्काळ मंजूरी देऊन उप शिक्षकांची जादा भरण्यात आलेल्या पदांचे समायोजन करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

सामान्य प्रशासन विभागातंर्गत वर्ग-४ मधील शिपाई संवर्गातील ५ कर्मचा-यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय अशी समितीने विचारणा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील सेवा ज्येष्ठतेनुसार शिपाई संवर्गातील ५ कर्मचा-यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. प्रशिक्षणानंतर सदरहू कर्मचा-यांची इच्छुकता मागवून दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. तसेच, पदोन्नतीपूर्वी या कर्मचा-यांना वाहनचालकांचे प्रशिक्षण देण्यात येईल असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

शिपाई संवर्गातील अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देऊन सेवा ज्येष्ठतेनुसार रिक्त असलेल्या वाहन चालकांच्या ५ पदांवर पदोन्नती देण्याची तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेमध्ये पदोन्नतीने १५ पदे व सरळ सेवेची ५० पदे रिक्त आहेत. अनुसूचीत जमातीची पदे भरली जात नसतील तर एकप्रकारे आदिवासींवर अन्याय होत आहे. रिक्त पदांची जाहिरात देत असताना त्याची प्रत प्रकल्प अधिकारी कार्यालय, समाज कल्याण कार्यालय व रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाला देण्याची आवश्यकता आहे. शैक्षणिक पात्रता असलेल्या आदिवासी समाजातील मुलांची जाणीवपूर्वक भरती केली जात नाही रिक्त असलेली पदे तात्काळ भरणेबाबत कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

विभागाकडून प्राप्त झालेल्या पुढील माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० जानेवारी २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली,

शासनाचे वित्त विभागाकडील शासन निर्णय दिनांक २ जून २०१५ नुसार रिक्त असणा-या पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्यात यावी व ग्रामसेवक, आरोग्य परिचारीका व पशुधन पर्यवेक्षक या संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ७५% पदे भरण्यास मुभा देण्यांत आलेली होती. उक्त शासन निर्णयानुसार रायगड जिल्हा परिषदेकडील रिक्त असलेली पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे. सदर जाहिरातीनुसार अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या विविध संवर्गाची खालीलप्रमाणे पदे भरण्यात आलेली आहेत :—

अ.क्र.	पदाचे नाव	अ. ज. साठी राखीव व रिक्त पदांची संख्या	अ. ज. साठी जाहिरातीतील पद संख्या	अनु. जमातीची भरलेली पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	कनिष्ठ सहायक (लेखा)	१	०	०
२	पर्यवेक्षिका	१	०	०
३	पर्यवेक्षिका (नि)	३	०	०
४	ग्रामविकास अधिकारी (स्पर्धा परिक्षा)	२	०	०
५	ग्रामविकास	१	१	०
६	आरोग्य पर्यवेक्षक	१	०	०

(१)	(२)	(३)	(४)	(५)
७	सेवक (पुरुष)	४	२	०
८	औषध निर्माण अधिकारी	२	१	१
९	उपशिक्षक	२७	०	०
१०	कनिष्ठ अभियंता	२	१	१
११	स्थापत्य अभियंत्रिकी सहायक	४	१	०
११	कनिष्ठ आरेखक	१	०	०
१२	शिपाई	१	१	१
	एकूण	५०	७	३

तसेच पदोन्नतीने भरावयाची अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	पदाचे नाव	अ. ज. रिक्त पदांची संख्या	अ. ज. भरलेली पदे	अनु. जमातीची रिक्त राहिलेली पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	कनिष्ठ लेखाधिकारी	२	१	१
२	वरिष्ठ सहायक (लेखा)	१	०	१
३	कनिष्ठ सहायक (लेखा)	१	०	१
४	ग्राम विकास अधिकारी	३	०	३
५	आरोग्य सेवक (महिला)	१	०	१
६	आरोग्य सेवक (पुरुष)	१	०	१
७	केंद्र प्रमुख	१	०	१
८	कनिष्ठ आरोग्य	१	०	१
९	पशुधन पर्यवेक्षक	१	०	१
१०	कनिष्ठ सहायक (लिपीक)	१	१	०
११	वाहन चालक	२	०	२
	एकूण	१५	२	३

वरीलप्रमाणे सरळसेवेने भरावयाच्या ५० पदांपैकी ७ पदांची जाहिराती देऊन ३ पदे भरण्यात आली आहेत. तसेच पदोन्नतीने भरावयाच्या १५ पदांपैकी २ पदे भरण्यांत आली असून निम्न संवर्गात पात्र

कर्मचारी नसल्याने पदोन्नतीचे १३ पदे भरण्यात आलेली नाहीत. निम्न संवर्गात पात्र कर्मचारी उपलब्ध होताच तात्काळ पदोन्नती देऊन पदे भरणेची कार्यवाही करण्यात येईल.

उक्त लेखी स्वरूपात प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने साक्षीच्या वेळी समितीने अनुसूचित जमातीच्या राखीव असलेल्या ५० पदांपैकी केवळ ७ पदांसाठी जाहिरात देण्यात आली आहे उर्वरित पदासाठी जाहिरात देण्यात आली नाही . त्याची कारणे काय अशी पृच्छा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद यांनी एकूण पदांच्या ४ टक्के व रिक्त पदाच्या ५० टक्के अशा प्रकारचे पद भरतीबाबतीत निर्बंध असल्याने केवळ ७ पदांची जाहिरात देण्यात आली आहे, असे समितीला विदित केले. समितीने संवर्गनिहाय अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळ सेवेने उर्वरित रिक्त असलेली ४७ पदे व पदोन्नतीने रिक्त असलेली १३ पदे भरण्याची कारवाई संबंधित विभागाने तात्काळ करावी असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

समितीने जिल्ह्यासाठी ठरविण्यात आलेल्या टक्केवारीनुसार जिल्हापरिषद कार्यालयात संवर्गनिहाय एकूण मंजूर असलेल्या पदांपैकी अनुसुचित जमातीसाठी राखीव असलेली पदे पूर्ण भरणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही. सबब, समितीने जिल्हा परिषद कार्यालयांतर्गत दिलेल्या जाहिरातीनुसार उर्वरित सरळसेवेने रिक्त असलेली ४७ पदे व पदोन्नतीने रिक्त असलेली १३ पदे तीन महिन्यांच्या आत भरण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नांदगाव येथील अपूर्ण असलेले बांधकाम–

जिल्हा बैठकीच्या वेळी आरोग्य विभागाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये प्राथमिक आरोग्य उपक्रेंद्र चाफेवाडी ता. कर्जत व प्राथमिक आरोग्य उपक्रेंद्र, नांदगाव येथील निवास स्थानाच्या दुरुस्तीच्या कामांमध्ये विलंब झालेला आहे. या कामांसाठी सन २०१२-१३ या वर्षात निधी प्राप्त झालेला आहे परंतु आजपर्यंत निधी खर्च झालेला नाही. ही दोन्ही कामे ई-निवीदास्तरावर आहेत. झालेल्या विलंबासंदर्भात चौकशी करून संबंधित अधिका-यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व या विषया संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

विभागाकडून पुढीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिनांक १० फेबुवारी २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र चाफेवाडी ता. कर्जत येथील उपकेंद्राचे कामाचे आदेश दिनांक ७ मे २०१३ रोजी काढण्यात आले. सदर काम पूर्ण करण्यात आले असून या कामावर रुपये १४,९८,८३५

इतका खर्च झालेला आहे. प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नांदगांव येथील उपकेंद्र बांधकामाचे आदेश दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजी काढण्यात आले. परंतु अपु-या जागेआभावी काम प्रलंबित आहे. उपकेंद्र नांदगांव कामासाठी आलेला निधीपैकी अखर्चित निधी दिनांक २६ डिसेंबर २०१४ रोजी शासनास भरणा करण्यात आला आहे.

दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने प्राथमिक आरोग्य उपकेंद्र चाफेवाडीचे काम दिनांक १५ऑक्टोबर २०१४ रोजी पूर्ण झालेले आहे. तथापि, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नांदगांव प्रकरणी कामाचे आदेश दिल्याचे म्हटले आहे. जागा उपलब्ध नसताना कामांचे आदेश कसे काय देण्यात आले आहे, एखादा प्रकल्प करतेवेळी जागा उपलब्ध आहे किंवा नाही हे तपासले जाते. जागेची शहानिशा न करता, काम करण्याचे कारण काय, यास कोण जबाबदार आहे अशी समितीने पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी नांदगांव येथे जागेचा प्रश्न असल्यामुळे सदरहू निधी समर्पित केलेला आहे. सदर जागा अयोग्य असल्याचे नंतर लक्षात आले. त्यामुळे काम होऊ शकले नाही असे समितीला विदित केले.

समितीने तांत्रिक मान्यता देताना जागा उपलब्ध आहे किंवा नाही हे प्रथम तपासणे आवश्यक होते. त्यानंतर प्रशासकीय मान्यता घेतली जाते. तांत्रिक मान्यता देतेवेळी जागेची पहाणी करण्यात आली होती काय अशी विचारणा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नांदगाव येथील जागा अपुरी असल्याचे नंतर निष्पन्न झाले असल्याने काम होऊ शकले नाही. म्हणजेच याप्रकरणी केलेली कार्यवाही चुकीची झालेली आहे. असे समितीला सांगितले.

समितीने कामाचा आराखडा तयार झाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता दिली जात नाही. असे असताना या कामाकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची कारणे काय? व या कामाकरिता कामाचे आदेश देखील दिले आहे तेव्हा काम न होण्याची कारणे काय आहे ? संबंधित उप अभियंता आणि ज्यांनी प्लॅनची जागा दाखविली आहे त्यांच्याकडून यामध्ये चूक झाली आहे काय, असल्यास संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशी समितीने पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी या प्रकरणात अपहार झाला नाही. सदरहू निधी समर्पित केलेला आहे.ही बाब उघडकीस आल्यानंतर संबंधित उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यावर कार्यवाही करून समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे समितीला विदित केले.

अभिप्राय व शिफारशी :

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, नांदगाव येथील कामाचे आदेश काढण्यात आलेले असताना सुद्धा अपु-या जागे अभावी काम प्रलंबित आहे. या कामासाठी संबंधित अधिका-यांनी जागा उपलब्ध आहे किंवा नाही याची तपासणी न करता, कामाचे आदेश काढण्यात आले व नंतर जागा अयोग्य आहे असे सांगितले

आहे. या कामासाठी प्राप्त झालेला निधी सुद्धा समर्पित करण्यात आला आहे ही बाब उघडकीस आल्यानंतर संबंधित उप अभियंता व शाखा अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कारवाई झालेली नाही याप्रकरणी उपअभियंता व शाखा अभियंता जबाबदार आहेत त्यांना तात्काळ नोटीस देऊन या कामाची चौकशी करण्यात यावी व चौकशीअंती त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(५) माध्यमिक शाळेतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थांना मिळणारे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करणे—

जिल्हा बैठकीच्या वेळी सन २०१४-१५ मध्ये माध्यमिक शाळेतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क देण्यासाठी निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत? सन २०१२-१३ मध्ये टीएसपी मध्ये ५२ हजार रुपये व ओटीएसपी मध्ये २.९२ लक्ष रुपये मिळाले होते ही सर्व रक्कम खर्ची पडली आहे. सन २०१३-१४ मध्ये टीएसपीमध्ये ७५ हजार रुपये व ओटीएसपीमध्ये ३.७५ लक्ष रुपये मिळाले होते ही सर्व रक्कम खर्च झालेली आहे. सन २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी १ लक्ष व बाहय क्षेत्रासाठी ४ लक्ष रुपये प्राप्त झाले होते सद्यः स्थितीत सदर रक्कम अखर्चित आहे त्याबाबतची माहिती साक्षीच्या वेळी समितीला सादर करावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी, सदर रक्कमा लाभार्थी विद्यार्थांच्या बँक खात्यात थेट वर्ग करावयाची असल्याने तांत्रिक अडचणींमुळे उशिरा झाला आहे सदर रक्कम वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे. अशी माहिती देण्यात आली. दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सन २०१४-२०१५ मध्ये अखर्चित असलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या कार्यवाहीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत? समितीची जिल्हा बैठक झाल्यानंतर देखील तातडीने कार्यवाही झालेली दिसून येत नाही अशी पृच्छा केली. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी विद्यार्थ्यांचे बँक खाते नंबर नसल्यामुळे संबंधित संस्थेच्या खात्यामध्ये धनादेशाद्वारे पैसे वर्ग केले आहे. संबंधित संस्था विद्यार्थ्यांना पैसे देणार आहे. असे समितीला सांगितले.

समितीची जिल्हा बैठक झाल्यानंतर निधी वर्ग केल्याचे दिसून येत आहे. निधी वर्ग न करण्याची कारणे काय व सदरहू निधी कोणत्या खात्यामध्ये जमा झाला आहे अशी समितीने विचारणा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर निधी समाज कल्याण विभागाच्या खात्यावर जमा केला होता.

सन २०१४-२०१५ मध्ये जमा होणारा निधी हा मार्च २०१६ पर्यंत खर्च करण्याची परवानगी आहे त्यानुसार कार्यालयाकडे विद्यार्थ्यांचे अर्ज उपलब्ध झाले असून, शाळांचे प्रस्ताव देखील प्राप्त झाले आहे, मात्र त्यांचे बँक खाते क्रमांक उपलब्ध झाले नाही. प्राप्त झालेल्या एकूण रक्कमे पैकी आदिवासी उपयोजनाक्षेत्रासाठी (टीएसपी) सत्र फी १८ रुपये प्रमाणे व परीक्षा फी ३४० रुपये प्रमाणे देय केली जाते. यामध्ये १०,९३४ रुपये सत्र फी व परीक्षा फी १,३८,०६० रुपये एवढी रक्कम जमा केली आहे. यामध्ये सत्र फी साठी ४०६ लाभार्थी व परीक्षा फी साठी ६०७ लाभार्थ्यांची संख्या आहे. असे एकूण १,०१३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रासाठी (ओटीएसपी) सत्र फी ९ रुपये आणि परीक्षा फी ३४० रुपये प्रमाणे एकूण ७८२ आणि १२४ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे त्यांचे बँक खाते क्रमांक नसल्यामुळे सदरहू निधी शाळेच्या बँक खात्यावर वर्ग केलेला आहे, कारण त्यावेळी शाळेच्या नावावर चेक जमा करण्याची परवानगी होती. सदरहू रक्कम विद्यार्थ्यांच्याच खात्यावर जमा झाली पाहिजे, असा शासनाने निर्णय घेतला. परंतु काही विद्यार्थ्यांचे वय लहान असल्यामुळे त्यांचे खाते उघडता आले नाही त्यानंतर शाळांनी कॅम्प घेऊन काही विद्यार्थ्यांचे खाते उघडले परंतु काही विद्यार्थ्यांचे खाते वडीलांच्या नावाने तर काही खाते भावाच्या नावाने उघडली आहेत परंतु त्यांची नावे जुळत नसल्यामुळे अशा खात्यावरील रक्कम जमा करण्यात आली नाही असे समितीला सांगितले असता, अपर आयुक्त, ठाणे यांनी विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्याच खात्यावर जमा झाली पाहिजे. शिष्यवृत्तीचे फॉर्म्स भरत असताना त्यावर बँकेचा खाते क्रमांक असतो. परंतु त्यांनी सांगितले की, बँक खाते क्रमांक मिळाले नाही, तसेच ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते नाही, त्या विद्यार्थ्यांचे पैसे शाळेच्या खात्यावर जमा केले जातात. शासनाच्या धोरणानुसार शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणे आवश्यक आहे असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने आदिवासी विभागाचा निधी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी दिला जात असतो. नवीन धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा झाला पाहिजे. आपण तशा सूचना केल्या पाहिजेत. यापूर्वी सदरहू रक्कम शाळेच्या शिक्षणवर्ग समितीकडे वर्ग करून त्यांच्याकडून वाटप केली जात होती. परंतु मध्यंतरी काही अडचणी आल्यामुळे सदरहू निधी थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे धोरण आले, परंतु शासनाच्या धोरणानुसार अंमलबजावणी झालेली नाही. अशी पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू निधी विद्यार्थ्यांच्या खात्यावरच जमा झाला पाहिजे, ही बाब खरी आहे. दर वर्षी शिक्षकांसाठी वार्षीक कॅम्प आयोजित केला जातो. सदरहू कॅम्पमध्ये त्यांना शिष्यवृती विद्यार्थ्याच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही पद्धतीची माहिती दिली जाते. परंतु आदिवासी क्षेत्रामध्ये काही भागात माहीती देणे शक्य होत नाही. असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

सन २०१४-२०१५ मध्ये अखर्चित असलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या कार्यवाहीस सहा महिने विलंब झाला आहे. समितीच्या जिल्हा बैठकीनंतर याप्रकरणी तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक होते. शासनाच्या धोरणानुसार रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करणे आवश्यक असताना सुद्धा त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही. सध्या विद्यार्थ्यांचे शुन्य बॅलेन्सवर खाते उघडले जात आहे. सदरहू निधी त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही त्वरित सुरू करण्यात यावी व या केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

तसेच आदिवासी क्षेत्रातील दुर्गम भागात कार्यरत असलेल्या शासकीय अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झालेली नाही असे ही समितीला भेटीच्यावेळी निदर्शनास आले आहे, राज्यात कार्यरत असलेल्या आदिवासी दुगर्म भागातील शाळांमध्ये कॅम्प आयोजित करण्यात यावा, विद्यार्थ्यांचे फार्म भरून व बॅक खाते उघडून त्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याची कायर्वाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(६) शबरी घरकुल योजनेतंर्गत आदिवासी लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देणे —

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने शबरी घरकुल योजनेअंतर्गत किती आदिवासी लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्यात आले नाही. तसेच आदिवासी लाभार्थ्यांच्या सुधारित प्रतिक्षा यादीनुसार ३२११ लाभार्थ्यांना लाभ मिळालेला नाही. सन २०१५-२०१६ साठी २३७५ चे टार्गेट असून ते यावर्षी पूर्ण केले जाणार आहे. याबाबतची माहिती विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत सादर करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

विभागाकडून प्राप्त झालेल्या पुढील माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात इंदिरा आवास योजना व शबरी घरकुल योजना राबविण्यात येतात. इंदिरा आवास योजनेकरीता लाभार्थीचे नाव दारीद्र्य रेषेखाली तसेच प्रतीक्षायादीत असणे आवश्यक आहे. तसेच दोन्ही योजनेकरिता लाभार्थी बेघर असावा किंवा त्याचे कच्चे घर असावे असे निकष आहेत, त्यानुसार एकूण २६३१ लाभार्थ्याना घरकुल उपलब्ध करून द्यावयाची राहीली आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थ्याकरिता २३८५ चे उद्दीष्ट प्राप्त असून गट विकास अधिकारी यांचेकडून आतापर्यत ४५५ आदिवासी लाभार्थ्यांचे प्रस्ताव या

कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे त्यांना मंजूरी देण्यात आली आहे. उर्वरीत १९३० लाभार्थ्यांचे प्रस्ताव गट विकास अधिकारी यांचेकडून प्राप्त झाले नंतर मंजुरी देणेची कार्यवाही करण्यात येईल. आदिवासी व कातकरी समाजासाठी शबरी घरकूल योजनेमधून १२५ आदिवासी लाभार्थ्यांना घरकूल मंजूर करण्यात आलेली आहेत.

समितीने उक्त माहितीच्या अनुषंगाने आदिवासी भागात शबरी घरकुलाचे एकूण १२५ लाभार्थ्यांची उद्दीष्टे ठरविण्यात आले आहे. लाभार्थ्यांची नावे आलेली असून घरकुलाची कामे सुरू झालेली आहेत काय, व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने या कामांना मंजुरी दिली आहे काय, असल्यास ती कोणत्या स्तरावर आहे, अशी विचारणा केली असता, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आदिवासी प्रकल्प कार्यालय, पेण यांनी १२५ लाभार्थ्यांची यादी दिलेली आहे. त्याला मंजुरी दिलेली असून निधी वितरणाची कार्यवाही सुरू आहे. असे समितीला विषद केले.

समितीची आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत वेळेत लाभ गेला पाहिजे ही भूमिका आहे. दोन्ही विभागाच्या प्रक्रियेमुळे खालचा लाभार्थी वंचित राहत आहे. फेब्रुवारी महिना संपत आला आहे. दीड महिन्यात घरकुल बांधणे शक्य होणार आहे काय त्या अनुषंगाने लवकरात लवकर कार्यवाही होणे गरजेचे आहे. याप्रकरणी यंत्रणेकडून लाभार्थ्यांना निधी वितरीत करायला सुरूवात झाली आहे. दिलेल्या कालमर्यादेत बांधकामे पूर्ण करण्याची कार्यवाही झाली नाही तर अडचणी निर्माण होतील. अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी पेण पंचायत समितीकडून प्रकल्प कार्यालयाकडे लाभार्थ्यांची मागणी आलेली आहे. पावसाच्या आधी कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. असे समितीला सांगितले.

सन २०१५-२०१६ मधील पूर्ण निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे दिलेला आहे आणि निधीचे वितरणही झालेले आहे निधी दिल्यानंतर जिल्हा नियोजन बैठकीत वितरीत केलेल्या निधी पैकी किती खर्च झाला आहे अशी विचारणा केली जाते. निधी लवकरात लवकर वितरित होऊन प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचण्याच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाने अपर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, प्रत्येक प्रकल्प आधिकारी निहाय बैठक घेतली तर निश्चितपणे अखर्चित राहणारा निधी वेळेत खर्च होऊ शकेल. असे समितीचे मत आहे तसेच समितीला दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, १९३० लाभार्थ्यांचे प्रस्ताव गट विकास अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर मंजुरी देण्यात येईल. याचा अर्थ १९३० लाभार्थ्यांचे प्रस्ताव अद्याप गट विकास अधिका-यांकडून आलेले नाहीत. अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी समितीला असे सांगितले की, सर्व प्रस्ताव आता प्राप्त झालेले आहेत. शासनाने यामध्ये सुधारणा केली आहे की, पूर्वी सुधारित प्रतिक्षा याद्या आयुक्त मंजूर करायचे, ते अधिकार मुख्य कार्यकारी अधिका-यांना आता

दिले आहेत, त्याप्रमाणे प्राप्त झालेले २३८५ इतके लक्षांक असुन सद्यः स्थितीत त्यापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले आहेत. ते संपूर्ण टार्गेट पूर्ण करण्यात येईल. असे समितीला आ वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात शबरी घरकुल योजनेतंर्गत १२५ लाभार्थ्यांना घरकुल देण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे.लाभार्थ्यांची यादी प्राप्त झाली असून निधी वितरणाची कार्यवाही सुरू आहे. असे समितीच्या निदर्शनास आले. सबब, समितीने दिलेल्या निदेशानुसार शबरी घरकुलाची कामे माहे जून, २०१६ च्या आत पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा.

तसेच सन २०१५-१६ मधील पूर्ण निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे सूपूर्द केलेला आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे १९३० लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून २३८५ इतके लक्षांक पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे. ठरविण्यात आलेल्या लक्षांकानुसार आदिवासी क्षेत्रात शबरी घरकुलाची कामे पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीच्या साक्षीच्या बैठकीच्यावेळी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाची इंदिरा आवास योजना गेल्या २५ वर्षांपासून राज्यात कार्यरत आहे. राज्य शासनाची अनुसूचित जातीकरिता रमाई घरकूल योजना आणि आदिवासींकरिता शबरी घरकूल योजना राबविली जात आहे. त्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून निधी दिला जातो. व ही योजना प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गट विकास अधिकारी या यंत्रणाकडून राबविण्यात येत आहे. सध्या राज्यात एक ग्रामीण निवारा योजना जलदगतीने शासनाने सुरू केली आहे. या योजनेवर डिसेंबर महिन्यापासून जानेवारी २०१६ पर्यंत १८० कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर वितरीत केलेले आहे, त्यामध्ये आदिवासी लाभार्थ्यांचा समावेश आहे असे समितीला विषद केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांनी एकसुत्रीकरण करून ही कामे करावयाची आहेत. मात्र अशी घरकुले ही शक्यतो दारिद्रयरेषेखालील (BPL) कार्डधारक लोकांना दिली जातात. आदिवासी विभागातील एखादा द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्डधारक असेल व तो जिल्हा ग्रामीण यंत्रणेमध्ये बसत नसेल अशा लोकांना योजनेतून लाभ दिला जातो काय तसेच त्यामध्ये द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्डधारक असलेला लाभार्थी देखील ग्राह्य धरला जाणार आहे काय अशी समितीने पृच्छा केली असता, विभागीय सचिव यांनी असे सांगितले की, केंद्र शासन पुढील वर्षी इंदिरा आवास योजना द्रारिद्र्यरेषेवरील (APL) कार्डधारकांसाठी सुरू करणार आहे. सामाजिक, आर्थिक सर्वेक्षणामध्ये त्यांनी त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतची माहिती संगणकात नोंदविलेली आहे, द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्ड लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत दुमत नाही,

मात्र द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्डच्या व्याख्येबाबत थोडी तांत्रिक अडचण आहे, याबाबत आदिवासी विकास विभागाशी चर्चा करण्यात येणार आहे असे समितीला विषद केले.

अभिप्राय व शिफारशी :

केंद्र शासनाची इंदिरा आवास योजना मागील २५ वर्षांपासून राज्यात कार्यान्वित आहे. आदिवासी लोकांसाठी शबरी घरकुल योजना राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येत आहे. ही सर्व कामे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून राबवित असताना इंदिरा आवास घरकुल शक्यतो दारिद्रयरेषेखालील (BPL) कार्डधारक लोकांना दिली जाते. तर आदिवासी भागातील द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्डधारकांना शबरी घरकुल योजनेतून लाभ दिला जातो. शासन लवकरच घरकुल प्रकरणी नविन धोरण आखणार आहे. या नविन घरकुल योजनेमध्ये दारिद्रयरेषेखालील (BPL) कार्डधारकांसमवेत द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्डधारकांचा समावेश केल्यास आदिवासी लाभार्थ्यांना त्यांचा लाभ घेता येईल सबब, समितीच्या सुचनेनुसार द्रारिद्रयरेषेवरील (APL) कार्ड धारकाच्या व्याखेत असलेल्या तांत्रिक अडचणी प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा व इंदिरा आवास योजनेतून आदिवासी भागातील द्रारिद्र्यरेषेवरील (APL)कार्डधारकांना घरकुल मंजूर करण्याची कारवाई करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकल्प कार्यालय, पेण, (जि. रायगड)

(७) कोळघर शासकीय आश्रमशाळा व राज्यात मंजूरी देण्यात आलेल्या आश्रमशाळाची अपूर्ण असलेली बांधकामे पूर्ण करणे—

जिल्हा बैठकीच्यावेळी समितीने कोळघर शासकीय आश्रमशाळेला भेट दिली असता, समितीच्या असे निदर्शनास आले की, कोळघर येथील आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम मागील १० वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. तसेच अनुदानित खाजगी आश्रमशाळांचे बांधकाम योग्य पद्धतीने केलेले नाहीत. कोळघर आश्रमशाळेच्या बांधकामबाबत झालेल्या विलंबाची माहिती साक्षीच्या वेळी सादर करावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक १७ फेबुवारी २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी प्रकल्प कार्यालय, पेण (जि.रायगड) या कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या कोळघर आश्रमशाळेच्या इमारतीच्या बांधकामचे स्ट्रक्चर १०० टक्के पूर्ण असून अंतर्गत गिलाव्याचे काम सुरू आहे. सदर आश्रमशाळेचे बांधकाम हे माहे मे, २०१६ अखेर पूर्ण करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांनी कळविलेले आहे अशी माहिती देण्यात आली.

समितीने कोळघर आश्रमशाळेचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे अशी पृच्छा केली असता, विभागीय सचिव आदिवासी विकास विभाग यांनी समितीस असे विषद केले की, कोळघर आश्रमशाळेचे बांधकाम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांनी मे, २०१६ अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे आ वासन दिलेले आहे. याकामासाठी आणखी अधिकचा निधी लागला तर तो विभागाकडून देण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.

या इमारतीचे बांधकाम दहा वर्षांपासून प्रलंबित आहे त्यामुळे कामाच्या अंदाजपत्रकात डीएसआरच्या किंमतीनुसार वाढ होणार आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे काय, सन २००८ चा डीएसआर आणि आताचा डीएसआर यामध्ये दुपटीचा फरक असेल तर किंमतीमध्ये झालेली वाढ ही जास्त असणार आहे. याप्रकरणी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच याकामात बांधकाम विभागाची किंवा कंत्राटदाराची चूक असेल तर त्याप्रमाणे त्यांना योग्य ती शिक्षा होणे आवश्यक आहे. विनाकारण वाढीव रकमेची नुकसानभरपाई द्यावी लागली तर आदिवासी विकास विभागाचा पैसा वाया जाईल अशी समितीने पृच्छा केली.

विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सन २००८ मध्ये याकामाकरिता प्रशासकीय मंजूरी घेतली आहे. काम पूर्ण होत असून कामाकरीता मागणीप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. बांधकाम विभागाला कामे देत असताना अटी व शर्ती घालण्यात आलेल्या आहेत, त्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करून नुकसानभरपाई देण्यात येईल किंवा दंडही वसूल करण्यात येईल, असे समितीला विषद केले असता, अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, दिनांक ०३ जानेवारी २०१२ मध्ये या कामाकरिता वर्क ऑर्डर दिली गेली आहे. संबंधित ठेकेदाराला सन २०१३ पर्यंत सदरहू काम पूर्ण करण्याबाबत सांगितले होते. कामाच्या विलंबाबाबत ठेकेदाराकडून असा खुलासा आलेला आहे की, रायगड जिल्ह्यामध्ये वाळूवरील बंदीमुळे कामास विलंब झालेला आहे. उक्त खुलाशान्वये प्रकल्प कार्यालयाने सदरहू ठेकेदारास प्रतिदिन याप्रमाणे २१४ रुपये दंड सुरू केलेला आहे.

समितीने प्रकल्प कार्यालयाकडून ठेकेदारांला पहिली मुदतवाढ दिलेली आहे. ठेकेदाराने निविदा घेताना सर्व गोष्टी लक्षात घेऊन निविदा भरल्या पाहिजे. कामासाठी रेती उपलब्ध होत नसेल तर ती ठेकेदाराची जबाबदारी आहे अशी पृच्छा केली. विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी या कामाला यापूर्वीच उशिर झाला आहे ठेकेदाराकडून विलंब झाला तर त्यांना वाढीव किमंत देत नाही. या कामाची ऑर्डर सन २०१२ मध्ये देण्यात आली होती. परंतु आता सन २०१६ सुरू आहे. हे काम सन २०१३ मध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे होते. या दोन वर्षात कार्यकारी अभियंत्यानी

कोणती कारवाई केली आहे ते तपासावे लागणार आहे. सध्या ठेकेदारांला प्रतिदिन २१४ रुपये दंड आकारलेला आहे. या आश्रमशाळेचे काम जवळपास ८० टक्के पूर्ण झालेले आहे. नवीन शैक्षणिक क्षेत्रात नवीन इमारतीमध्ये शाळा सुरू होईल याची दक्षता घेण्यात येईल असे समितीला आ वासित केले.

समितीने कोळघर आश्रमशाळेचे बांधकाम मे महिन्यात पूर्ण होणार असून यासाठी जो निधी लागणार आहे त्याची तरतूद येणा-या अंदाजपत्रकामध्ये केली जाणार आहे अशी माहिती दिलेली आहे. राज्यात ज्या कामांना मंजुरी दिलेली आहे ती कामे सुरू आहेत अशा सर्व आश्रमशाळाची प्रलंबित असलेली कामे सुरू करण्यासाठी मार्च महिन्यामध्ये सादर होणा-या अंदाजपत्रकात निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे काय अशी पृच्छा केली असता, विभागीय सचिव आदिवासी विकास विभाग यांनी राज्यातील प्रगतीपथावरील आश्रमशाळेसाठी शासनाने २५० कोटी रुपयांची तरतूद केलेली असून दि.१६ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत ८० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. शिल्लक निधी मागणीप्रमाणे मार्च अखेरपर्यंत उपलब्ध करून दिला जाणार आहे. माहे डिसेंबर, २०१५ मध्ये झालेल्या बैठकीच्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी ८० कामे पूर्ण करून दिली जाणार आहेत अशी माहिती दिली होती. ८० कामांपैकी ४२ कामे पूर्ण करून ती कामे विभागाला हस्तांतरीत केलेली आहे. उरलेली कामे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करून दिली जाणार आहेत. जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्याचा विभागाचा प्रयत्न सुरू आहे. या शैक्षणिक वर्षात वसतीगृहामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न करीत आहोत. नवीन आणि जुनी वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांची क्षमता वाढविता येईल काय. यादृष्टीनेही विभागाचे नियोजन सुरू आहे असे समितीला विषद केले.

समितीने प्रगतीपथावर सुरू असलेल्या आश्रमशाळेसाठी २५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आतापर्यंत या कामांसाठी ८० कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. ही सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सुरू आहेत. दिलेल्या कालावधीत किती कामे पूर्ण झाली पाहिजेत असे सार्वजनिक बांधकाम विभागाला बंधन घातले नव्हते काय, शासकीय कामाच्या संदर्भात तहसीलदार वाळूचा कोटा उपलब्ध करून देत असतात. २५० कोटी रुपयांपैकी विभागाने केवळ ८० कोटी रुपये खर्च केले ही चिंतेची बाब आहे. प्राप्त निधी खर्च होतो आहे किंवा नाही याबाबत विभागाने आढावा घेण्याची आवश्यकता आहे. निधी खर्च होत नसल्यामुळे तो निधी इतर विभागाला वर्ग केला जात असतो, त्यामुळे निधी वेळेत खर्च होण्याच्या दृष्टीने अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांना सूचना दिल्या तर निधी वेळेवर खर्च होईल असे निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशी :

कोळघर शासकीय आश्रमशाळेचे बांधकाम मागील १० वर्षांपासुन अपूर्ण आहे. या कामासाठी वाढीव किंमतीनुसार सुधारित अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरहू काम पूर्ण होणेसाठी संबंधित कंत्राटदाराला माहे जाने, २०१२ मध्ये कामाचे आदेश दिले असून आश्रमशाळेचे बांधकाम सन २०१३ पर्यंत पूर्ण करणे अभिप्रेत असताना काम पूर्ण झाले नाही, आता सन २०१६ वर्ष सुरू आहे या दोन वर्षाच्या कालावधीत कार्यकारी अभियंत्यांनी संबंधित ठेकेदाराविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल व शासकीय आश्रमशाळेचे बांधकाम माहे मे २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

राज्यात ज्या आश्रमशाळांच्या कामांना मंजुरी दिलेली आहे अशी सर्व प्रलंबित असलेली कामे सुरू करण्यासाठी शिल्लक निधीच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रकात निधीची तरतूद करण्यात यावी. तसेच राज्यात ज्या आश्रमशाळेची बांधकामे प्रगतीपथावर आहे अशा सर्व आश्रमशाळांसाठी शासनाने तरतूद केलेल्या रु. २५० कोटी रुपयांपैकी ८० कोटी रुपये माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंत खर्च झाले आहे. झालेल्या खर्चात ८० कामांपैकी ४२ कामे पूर्ण करून ती विभागाला हस्तांतरीत केलेली आहे. उर्वरित अपूर्ण असलेली ३८ कामे पुढील तीन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी व कामे पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

विभागीय सचिव यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, आश्रमशाळेची काही कामे राज्यपातळीवरून व काही कामे डीपीसी पातळीवरून केली जातात. डीपीसीच्या संदर्भात जिल्हाधिका-यांनी व राज्यपातळीवरील कामे विभागामार्फत करण्यात येतात. राज्यातील ५२८ आश्रमशाळांपैकी जवळपास २०० आश्रमशाळा टिएसपीमध्ये आहेत व ३२८ शाळा राज्यपातळीवरील आहेत. राज्यपातळीवरील कामासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद या वर्षी करण्यात आलेली आहे. हा निधी येत्या एक-दोन वर्षात खर्च होईल. राज्यपातळीवरील कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणार असल्यामुळे ही कामे पुर्ण होतील. आदिवासी विभागाचा चालू वर्षाचा अंदाजपत्रकात मंजूर करण्यात आलेला निधी वर्षाच्या शेवटी म्हणजे ३१ मार्चला आदिवासी उपाययोजनांच्या खात्यावर आदिवासी उपयोजनांवर टाकला जातो त्यामुळे कामे होत नाहीत. त्यामुळे हा निधी वेळेमध्ये टाकला जावा अशा सूचना समितीने दिल्या तर चांगले होईल. जोपर्यंत पैसे खात्यावर जमा होत नाही तोपर्यंत पैसे खर्च केले जाऊ शकत नाहीत. पैसा पडून राहिला तर तो पैसा इतर ठिकाणी वापरला जातो. त्यामुळे पैसा वेळेवर वितरीत करण्यासंदर्भात समितीमार्फत सूचना देण्यात याव्यात असे सुचविण्यात आले.

अभिप्राय व शिफारशी :

राज्यातील ५२८ आश्रमशाळांपैकी जवळपास २०० आश्रमशाळा आदिवासी उपाययोजना क्षेत्रात (TSP) अंतर्गत आहेत व ३२८ आश्रमशाळा राज्यपातळीवरील आहेत. आदिवासी उपाययोजना क्षेत्रातंर्गत सुरू असलेल्या आश्रमशाळांच्या बांधकामासाठी आदिवासी विकास विभागाने चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात मंजूर केलेला निधी वर्षाच्या शेवटी म्हणजे ३१ मार्चला आदिवासी उपाययोजनाच्या (TSP) खात्यावर जमा केला जातो त्यामुळे अपूर्ण कामे पूर्ण होत नाहीत. सबब, आदिवासी विकास विभागाने चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात मंजूर केलेला निधी त्याच वर्षात माहे एप्रिल-मे च्या शेवटपर्यंत आदिवासी उपाययोजनाच्या खात्यावर जमा करण्यात यावा व त्यानंतर निधी वेळेवर वितरीत करण्यात आल्यास आश्रम शाळांची अपूर्ण असलेली बांधकामे त्वरीत पूर्ण होतील, समितीने केलेल्या सुचनानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

(८) प्रकल्प कार्यालयाअंतर्गत रिक्त असलेली पदे भरणे—

जिल्हा बैठकीच्यावेळी समितीने प्रकल्प कार्यालय, पेण अंतर्गत कार्यरत असलेल्या वर्ग-३ व वर्ग-४ ची एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे भरलेली आहेत. अशी विचारणा केली असता, प्रकल्प अधिकारी, पेण यांनी वर्ग-३ मधील सरळसेवेने मंजूर पदे २४६९ असून त्यापैकी १८२२ पदे भरलेली आहेत त्यापैकी अनुसूचित जमातीची मंजूर पदे १७२ असून १३७ पदे भरलेली आहेत. २५ पदे रिक्त आहेत. प्राथमिक शिक्षकांची अनुसूचित जमातीची मंजूर पदे ५४ असून ४३ पदे भरलेली आहेत. तर ११ पदे रिक्त आहेत. असे समितीला सांगितले. तसेच अप्पर आयुक्त, ठाणे यांनी वर्ग-३ ची सरळसेवा व पदोन्नतीची भरती अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या पातळीवर होते.सन २०१४ मध्ये भरती प्रक्रिया घेतली होती. ती पूर्ण झालेली आहे. बिगर आदिवासी संघटनांनी न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. त्यामुळे चार पदांना स्थगिती आहे. बाकीची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. पदोन्नतीची पदे तीन महिन्यात भरली जातील असे समितीला आ वासित केले.

विभागाकडून प्राप्त झालेल्या पुढील माहितीच्या आधारे दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण १६ शासकीय आश्रमशाळा व १३ शासकिय वसतिगृह कार्यरत आहेत. वर्ग-३ मध्ये २६२ पदे मंजूर असून त्यापैकी १९५ पदे भरलेली आहेत व ६७ पदे रिक्त आहेत. तसेच वर्ग-४ मध्ये २३५ पदे मंजूर असून त्यापैकी २२७ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत. वर्ग-३ मधील संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही नियुक्ती प्राधिकारी, मा.अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे त्यांच्या स्तरावरून केली जाते.

समितीने प्रकल्प कार्यालयांतर्गत रिक्त असलेली वर्ग-३ मधील ६७ पदे व वर्ग-४ मधील ८ पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत अशी पृच्छा केली असता, अप्पर आयुक्त, ठाणे यांनी समितीस असे सांगितले की, वर्ग-३ ची पदे सन २०१२ पासून रिक्त आहेत व वर्ग ४ ची पदे सन २०१५ पासून रिक्त आहेत. वर्ग ३ ची पदे अपर आयुक्त कार्यालय स्तरावर रिक्त आहेत. वर्ग-३ च्या संदर्भात सन २०१४ मध्ये जाहिरात काढण्यात आली होती. परंतु त्या जाहिरातीला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असल्यामुळे वर्ग-३ च्या पदाची भरती प्रक्रिया पूर्णपणे बंद आहे. समितीने पदोन्नतीची पदे भरण्याच्या संदर्भात सूचना दिल्या होत्या त्यानुसार पदोन्नतीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आली आहे, अंतिम ज्येष्ठता सूची तयार करून प्रसिद्ध करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात बिंदू नामावली नोंदवही तयार केलेली असुन, बिंदू नामावली तपासण्याकरिता मागासवर्ग कक्षाने दिनांक २२ व २३ फेब्रुवारी, २०१६ हा दिनांक दिलेला आहे. बिदू नामावली तपासल्यानंतर त्वरित पदोन्नतीच्या संदर्भात बैठक घेऊन पदोन्नतीची पदे भरली जाणार आहेत,असे समितीला सांगण्यात आले.

अभिप्राय व शिफारशी :

प्रकल्प कार्यालय, पेण, जि. रायगड अंतर्गत सरळ सेवेने वर्ग-३ मध्ये ६७ पदे व वर्ग-४ मध्ये ८ पदे सन २०१२ पासून रिक्त आहे. वर्ग-३ मधील रिक्त असलेली पदे अपर आयुक्त, ठाणे यांच्या स्तरावरून भरली जातात. तथापि, या भरती प्रक्रियेला न्यायालयीन स्थगिती असल्याने भरती प्रक्रिया बंद आहे. सबब, अपर आयुक्त कार्यालयाअंतर्गत येत असलेली वर्ग-३ मधील ६७ पदे रिक्त असल्याने कार्यालयाने न्यायालयीन स्थगितीबाबत योग्य तो पाठपुरावा करून भरती प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. तसेच वर्ग-३ मध्ये पदोन्नतीची रिक्त असलेली पदे बिंदू नामावली नोंदवही तपासल्यानंतर त्वरीत पदोन्नती समितीची बैठक घेऊन रिक्त असलेली पदोन्नतीची पदे भरण्यात यावी. तसेच वर्ग-४ मध्ये ८ पदे सन २०१२ पासून रिक्त आहे रिक्तपदे भरणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

(९) पेसा कायद्यातंर्गत आदिवासी उपयोजनाक्षेत्रात भरावयाची पदे—

विभागीय सचिव आदिवासी विकास विभाग यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, पेसा कायद्यांतर्गत १२ पदे आदिवासी भागातीलच भरावीत असे माननीय राज्यपाल महोदयांनी परिपत्रक काढले असून त्या परिपत्रकाला न्यायालयात आव्हान देण्यात आलेले आहे. पदे भरताना महसूल विभाग, ग्रामीण विकास विभाग, आदिवासी विकास विभाग व आरोग्य विभागांचा संबंध आहे. त्यापैकी

आदिवासी विकास विभागातील वर्ग-४ मधील एक पद आणि एक पद इन्सपेक्टरचे आहे अशी दोन पदे आहेत. महसूल विभागात तलाठी, कोतवाल, ग्रामविकास विभागातील ग्रामसेवक आणि शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांची पदे आहेत. यामुळेच चारही विभागांना प्रतिज्ञापत्र द्यावे लागणार आहे.आरोग्य विभागाने प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. आदिवासी विकास विभागाने यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र दिलेले आहे परंतु दोन विभागाने प्रतिज्ञापत्र दिलेले नाही. महाअधिवक्ता यांच्याकडे केवळ दोनच विभागाचे प्रतिज्ञापत्र गेलेले आहे. सर्व विभागाचे प्रतिज्ञापत्र आल्यानंतर ते सादर केले जाईल असे महाअधिवक्ता यांचे म्हणणे आहे. या केसला जवळपास एक वर्ष झालेले आहे. असे समितीला विदित केले. समितीने दोन विभाग प्रतिज्ञापत्र देत नसल्यामुळे आदिवासी बांधवाना नोकरीच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे. प्रतिज्ञापत्र दिल्याशिवाय ही केस सुरू होऊ शकत नाही. जेवढा विलंब होईल तेवढा आदिवासी बांधवांवर अन्यायच होणार आहे या विषयाच्या संदर्भात आदिवासी विभागाच्या सचिवांनी संबंधित विभागाच्या सचिवांना किंवा मंत्री महोदयांना विनंती करून ही बाब निदर्शनास आणून देण्यात यावी व दोन विभागांना न्यायालयात प्रतिज्ञापत्रक सादर करणेबाबत कळविण्यात यावे असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

पेसा कायद्यांतर्गत आदिवासी भागातून १२ पदे भरण्यात यावी असे मा. राज्यपाल महोदयांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे. तथापि, या परिपत्रकाला न्यायालयात आव्हान देण्यात आलेले आहे, या परिपत्रकानुसार आदिवासी भागातील पदे भरताना त्यामध्ये महसूल, ग्रामीण विकास, आरोग्य विभाग व आदिवासी विकास विभागाचा प्रामुख्याने संबंध असल्याने या चारही विभागांना न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. वरील विभागापैकी आदिवासी विकास व आरोग्य विभागाने महाअधिवक्ता यांचेकडे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. उर्वरित (महसूल व ग्रामीण विकास) विभागाने अद्यापपर्यंत प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केलेले नाही. दोन विभागाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले नसल्यामुळे आदिवासी बांधवांना नोकरीच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे आदिवासी लोकांवर हा एक प्रकारे अन्यायच होणार आहे. सबब, महसूल विभाग व ग्रामीण विकास विभागाने एक महिन्याच्या आत प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर करावे, त्याचप्रमाणे विभागीय सचिव (आदिवासी विकास विभाग) यांनी संबंधित विभागाच्या सचिवांकडे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी पाठपुरावा करावा. समितीने केलेल्या उक्त शिफारशीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशीही समिती शिफारस करीत आहे.

(१०) समितीने सुचविलेल्या अन्य महत्वाच्या शिफारशी :—

(१) नेरळ वसतीगृहाच्या बांधकामाचे अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर वसतीगृहाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे काम सुपुर्त करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करून नेरळ वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(२) पेण प्रकल्प कार्यालयांतर्गत पाच आश्रमशाळा सध्या भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. या आश्रमशाळेसाठी शासकीय जागा मिळविण्यासाठी अपर आयुक्त, ठाणे यांच्या स्तरावरून शासनाकडे प्रस्ताव पाठवून योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(३) समितीने उंबरे आश्रम शाळेला भेट दिली असता तेथील विद्यार्थ्यांची संख्या २१ ऐवढया कमी प्रमाणात आढळून आलेली आहे. त्यामुळे शाळेत शिक्षक थांबत नाहीत. या आश्रमशाळेत विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे तेथील शिक्षकांचे वेतन व अनुदान रोखण्यात आले आहे. या आश्रमशाळेत कमी विद्यार्थी असताना अनेक वर्षापासून आश्रमशाळेला अनुदान दिले आहे. या आश्रम शाळेत विद्यार्थ्यांची संख्या केव्हापासून कमी प्रमाणात आहे तसेच मागील तीन वर्षात (सन २०१२ - २०१३ ते सन २०१४-२०१५) या संस्थेला एकूण किती अनुदान दिलेले आहे. याबाबत अपर आयुक्त स्तरावरून चौकशी करण्यात यावी व वरील कालावधीत देण्यात आलेल्या अतिरिक्त अनुदानाच्या रक्कमेची वसुली करण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करण्यात यावी.

उंबरे अनुदानित आश्रम शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या शिक्षकांना दुस-या अनुदानित आश्रमशाळेत समायोजन करण्याची कार्यवाही व आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची दुस-या नजीकच्या आश्रमशाळेत पर्यायी व्यवस्था करणेबाबत अपर आयुक्त स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

तसेच उंबरे आश्रमशाळेचे अनुदान सध्या रोखण्यात आलेले आहे व विद्यार्थ्यांची संख्या कमी प्रमाणात आहे अशा स्थितीत उंबरे अनुदानीत आश्रमशाळा शासनाकडे वर्ग करता येईल काय याबाबत अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांनी नियमांनुसार तपासणी करून कार्यवाही करण्यात यावी.

वरील प्रमाणे केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) शासकीय आश्रमशाळेतील स्वच्छतेबाबत मुख्याध्यापकांना प्रकल्प कार्यालयाकडून दिलेल्या सुचनानुसार आश्रमशाळेतील किरकोळ दुरुस्ती, पाण्याची सुविधा उपलब्ध करणे व इतर स्वच्छता ठेवण्यासाठी सध्या एक लक्ष रुपये एवढा निधी उपलब्ध करून दिला आहे. समितीने शासकीय आश्रमशाळांना भेटी दिल्या असता अनेक आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पिण्याची पाण्याची व्यवस्था नसणे, व स्वच्छता नसल्याचे आढळून आले आहे. त्यानुसार प्रकल्प अधिकारी यांनी प्रत्येक शासकीय आश्रमशाळेत प्रत्यक्ष भेट देऊन मुख्याध्यापकांकडे दिलेल्या निधीनुसार विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत किंवा नाही. याबाबतची तपासणी करून संबंधितांविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी.

(५) शासकीय आश्रमशाळा, कात्रज येथे समितीने भेट दिली असता या आश्रमशाळेत विज्ञानशाखा व कौशल्य विकास शाखा सुरू करण्याबाबत अपर आयुक्त, ठाणे यांच्याकडे दिनांक ११ फेब्रुवारी २०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. असे समितीच्या निदर्शनास आले. सबब, सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवून याप्रकरणी योग्य तो निर्णय घेण्यात यावा. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा. तसेच उक्त विषयासंबधित वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेल्या २१ शाळांचे प्रस्तावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

(६) आश्रमशाळेमध्ये शिक्षकांची व चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त आहेत. शासनातर्फे शिक्षकांच्या भरती प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यात येणार असून शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू करण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर भरती प्रक्रिया राबविताना अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे जून किंवा जुलै पर्यंत समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशीही शिफारस समिती करीत आहे.

विशेष शिफारस

(११) प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे वैजापूर, ता. चोपडा, जि.जळगाव येथील बांधकामास निधी उपलब्ध करून देणे—

मौजे वैजापूर, ता. चोपडा, जि. जळगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे ८० टक्के बांधकाम ३ वर्षापासून झालेले आहे. परंतु या कामासाठी जिल्हा परिषद, आरोग्य विभाग निधी देत नाही. जिल्हा परिषदेने या कामाचा निधी शासनाकडे जमा केला आहे. ठेकेदाराला रक्कम मिळत नसल्यामुळे ठेकेदाराने आता काम थांबवले आहे. बांधकामामध्ये ५ ते १० वर्षे जात असतील तर

बांधकामाचे जीवनमान कमी होईल प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम ८० टक्के पूर्ण झाले असताना ठेकेदाराला पैसे न मिळण्यात जिल्हा परिषदेची चूक आहे. परंतु याचा भुर्दंड ठेकेदाराला बसत असतो तसाच तो शासनालाही बसत असतो असे मा.समिती सदस्यांनी बैठकीच्यावेळी निदर्शनास आणण्यात आले. विभागीय सचिवांनी अशा कामाच्या संदर्भात जिल्हा नियोजन समितीमध्ये तरतूद आहे. एका जिल्ह्यात १० ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करावयाच्या असतील तर एकाच वेळी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम होणार नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिका-यांनी मागणी केली पाहिजे. एकाच वेळी सर्व कामे होत नाहीत तथापि जिल्हा आरोग्य अधिका-यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये प्रकल्प कार्यालयाकडे निधीची मागणी केल्यास आदिवासी विकास विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत मौजे वैजापूर ता. चोपडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीच्या बांधकामाला ३ वर्षापूर्वी सुरूवात केलेली आहे. या आरोग्यकेंद्राचे बांधकाम ८० टक्के पूर्ण झालेले असताना निधी अभावी बांधकाम अपूर्ण आहे. जिल्हा परिषदेने या कामाचा निधी शासनाकडे जमा केलेला आहे. या कामांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये आरोग्य अधिका-यांनी आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे निधीची मागणी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी व आदिवासी विकास विभागाने निधीची उपलब्धता करून दिल्यास मौजे वैजापूर आरोग्यकेंद्राचे अपूर्ण असलेले बांधकाम तात्काळ पूर्ण करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

पहिली बैठक

दिनांक १९ ऑगस्ट २०१५

समितीची जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद, कार्यालय अलिबाग जि.रायगड येथे बैठक झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. डॉ अशोक उईके, वि.स.स.

(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.

(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(८) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(९) श्री. काशीराम पावरा, वि.स.स

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१२) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(२) आनंद राहाटे, कक्ष अधिकारी,

विभागीय प्रतिनीधी :

(१) श्रीमती शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी, रायगड

(२) श्री. सतिश बागल, निवासी उप जिल्हाधिकारी, रायगड

(३) श्री. प्रविण शिंदे, अपर जिल्हाधिकारी, रायगड

(४) श्री. सुनिल जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड

(५) श्री. नितीन गुदगे, उप वन संरक्षक, अलिबाग, जि. रायगड

(६) श्री. सुभाष मुळवणे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(७) श्री. प्रकाश खोपकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(८) डॉ. अविनाश गोटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(९) श्री. प्रविण देविचंद जैन, मुख्य लेखा व वित्त आधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(१०) श्री. अशोक उगलमुगले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) डॉ. आर. एन. खंडागळे, जिल्हा आरोग्य अधिकारी व इतर जिल्हा परिषद अधिकारी वर्ग

मागासवर्ग कक्ष,

(१) श्रीमती कल्पना जगताप, सहायक आयुक्त मावक, कोकण विभाग.

आदिवासी विकास विभाग, ठाणे

(१) श्री. मि. भ. गवादे, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे.

(२) श्री. किरण माळी, उपायुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे.

(३) श्रीमती दाभाडे, प्रकल्प अधिकारी, पेण जिल्हा रायगड.

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे

(१) श्री. वि. ना. ठोंबरे, सह आयुक्त, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय अलिबाग (जि.रायगड) या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचां-याच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच यंत्रणांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

दिनांक २० ऑगस्ट २०१५

समितीची नगर परिषद, कर्जत (जि. रायगड) येथे आढावा बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. डॉ अशोक उईके, वि.स.स.

(३) श्री. राजू. तोडसाम, वि.स.स.

(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.

(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(८) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(९) श्री. काशीराम पावरा, वि.स.स

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१२) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनीधी :

(१) श्रीमती शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी, रायगड

(२) श्री. मोहम्मद सुवेज हक, पोलीस अधीक्षक (ग्रामीण), रायगड

(३) श्री. सुभाष मुळवणे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(४) श्री. प्रकाश खोपकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(५) श्री. प्रवीण शिंदे, अपर जिल्हाधिकारी, रायगड

(६) श्री. सतिश बागल, निवासी उप जिल्हाधिकारी, रायगड

(७) श्री. डॉ अविनाश गोटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(८) श्री. सुनील जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी

(९) श्री. फारुख शेख, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

(१०) श्री. अशोक उगलमुगले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१२) श्री. शेषराव बडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१३) श्री. नितीन गुदगे, उप वनसंरक्षक, अलिबाग

(१४) श्री. प्रविण देविचंद जैन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१५) डॉ. आर. एन. खंडागळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१६) श्री. राजेश कुळकर्णी, उप मु. का. अ, ग्रामपंचायत

मागासवर्ग कक्ष, कोकण विभाग, नवी मुंबई :

(१) श्रीमती कल्पना जगताप, सहायक आयुक्त, मावक, कोकण विभाग

आदिवासी विकास विभाग :

(१) श्री. मि.भ.गवादे, अपर आयुक्त, आदिवासी विभाग, ठाणे

(२) श्री. किरण माळी, उपायुक्त, आदिवासी विभाग, ठाणे

(३) श्रीमती आर.व्ही.दाभाडे, प्रकल्प अधिकारी, पेण, जि. रायगड

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे :

(१) श्री. वि. ना. ठोंबरे, सह आयुक्त, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती

उक्त बैठकीत समितीने दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय, रायगड येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीला दिलेल्या आ वासीत मुद्याबाबत व समितीने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कामांना दिलेल्या भेटीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात आढावा बैठक घेवून संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

दिनांक १० सप्टेंबर २०१५

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वा घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(५) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(६) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(७) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(८) ॲड. निरंजन डावखरे, वि.स.स.

(९) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव.

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती),

(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

मंत्रालयीन अधिकारी :

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग,

(२) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग,

(३) श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

(४) श्री. टि. वा. करपते, उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग

(५) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. संजय बनकर, उपसचिव, ग्रामविकास विभाग

विभागीय प्रतिनिधी, रायगड :

(१) श्रीमती सोनाली पोंक्षे-वायंगणकर, आयुक्त, आदिवासी विकास

(२) श्री. दिलीप पांढरपट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(३) श्री. मिलिंद गवादे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे

(४) डॉ अविनाश गोटे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(५) श्रीमती आर. व्ही. दाभाडे, प्रकल्प अधिकारी, पेण

(६) श्री. प्रकाश खोपकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(७) श्री. शेषराव बडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक विभाग)

(८) श्री. सं. सं. यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(९) श्री. डिगांबर चव्हाण, प्रभारी उप संचालक, अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती ठाणे

उक्त बैठकीत समितीने दिनांक १९ ऑगस्ट व २० ऑगस्ट २०१५ रोजी रायगड येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीला दिलेल्या आ वासित मुद्यावर कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले होते त्यानुसार साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

चौथी बैठक

दिनांक- २९ मार्च २०१६

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वा. घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(५) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(६) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(७) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(८) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती),

(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी,

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई